आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक २६ मे २०२५

ठळक बातम्या

1. गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील आरोग्य पायाभूत सुविधांचे परिदृश्य बदलले असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नागपुरात प्रतिपादन.
2. कामठी तालुक्यात चिचोली इथं उभारण्यात येणाऱ्या राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठाच्या कायमस्वरूपी कॅम्पसचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते भूमिपुजन.
3. देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट देशातच तयार व्हावी ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दाहोद इथं प्रतिपादन.
4. राज्यात मोसमी पावसानं पदार्पणातच मोडला १०७ वर्षांचा विक्रम, विदर्भात ३० मे पर्यंत वादळी पर्जन्यमान.

--------------------------------------------------

नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूट

गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील आरोग्य पायाभूत सुविधा आणि परिदृश्य बदलल असल्याच प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नागपूरमध्ये केल. अमित शहा आज नागपूरच्या जामठा परिसरातील नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूट-एनसीआय मध्ये कर्करोग रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासी सुविधा असलेल्या ‘स्वास्ती निवासची पायाभरणी’ कार्यक्रमात बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूटचे, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांवर प्रकाश टाकताना, शहा यांनी माहिती दिली की २०१४ पूर्वी केवळ ७ ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस एम्स होते. परंतु गेल्या ११ वर्षांत २३ एम्स मंजूर करण्यात आले आहेत. गेल्या ११ वर्षांत रुग्णालयांची संख्या, वैद्यकीय शिक्षणातील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.......

*(होल्ड बाईट - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह 45 सेकंद)*
*आज मैं आप सभी को बताना चाहता हूँ। इस 11 साल में 2014 में देश भर में सात एम्स थे अब 23 एम्स अप्रूव हो चूके है। मेडिकल कॉलेज 2014 तक देश भर में 387 थे आज 780 बन चुके हैं। एमबीबीएस की सीट की संख्या देश भर में 2014 तक इक्यावन हजार थी। आज एक लाख अठारह हजार एमबीबीएस डॉक्टर हर साल पास होकर बाहर निकल रहे हैं और पीजी सीट की संख्या इकतीस हजार थी इसको बढ़ाकर चौहत्तर हजार तक करने का काम किया है।*

शाह यांनी नमूद केल की मोदी सरकारन विविध योजनांद्वारे देशातील ६० कोटी गरीब लोकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले आहेत. नागपूरमध्ये राष्ट्रीय कर्करोग संस्था स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रयत्नांच कौतुक करताना, शाह म्हणाले की, स्वस्त दरात कर्करोग रुग्णांच्या नातेवाईकांना निवास आणि जेवणाची सेवा देणाऱ्या स्वस्ती निवाससारख्या सुविधा रुग्णालय प्रशासनात एक पथदर्शक प्रकल्प ठरतील. नागपूरमधील एनसीआय या संस्थेमध्ये कर्करोग संशोधनातील एक प्रीमियम संशोधन केंद्र आणि देशातील सर्वोत्तम कर्करोग रुग्णालयांपैकी एक बनण्याची क्षमता आहे. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशी आशा व्यक्त केली की, एनसीआय कर्करोग निदान आणि उपचारांच्या क्षेत्रात एक प्रीमियम संशोधन संस्था बनण्यासाठी प्रयत्न करेल....

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 42 सेकंद)*
*ये हॉस्पिटल था तो कई बार रात में जब मैं वहाँ आता था तो हॉस्पिटल के लॉन पर कई लोग सोये हुए दिखते थे तो थोड़ा मन को दुख भी होता था। इसलिए हम लोगों ने तय किया कि इसको हम जल्दी पूरा करेंगे और आज मुझे बहुत खुशी है कि इसका भूमि पूजन आज हुआ है और जल्द ही ये व्यवस्था खड़ी होगी तो पेशेंट्स के जो रिश्तेदार है उनके लिए भी यहाँ पर लंबे समय तक रुकने की व्यवस्था होगी। अभी हम लोग जब एन सी आई देख रहे थे तो आदरणीय अमित भाई ने हमको ये कहा कि इसको एक प्रीमियर रिसर्च इन्स्टिट्यूट के रूप में आप डेवलप कीजिए तो निश्चित रूप से आने वाले समय एक प्रीमियर रिसर्च इन्स्टिट्यूट के रूप में हम इसको विकसित करने का प्रयास करेंगे।*

एनसीआयच्या भेटीदरम्यान शाह यांनी रुग्णालय परिसराची पाहणी केली. शाह यांनी एनसीआयच्या जनरल, ओपीडी आणि बालरोग वॉर्डलाही भेट दिली आणि डॉक्टरांशी संवाद साधला. एनसीआय हे आबाजी थत्ते अनुसंधान केंद्राअंतर्गत चालविण्यात येत असून याची पायाभरणी २०१५ झाली तर २०२३ मध्ये याचे अधिकृत उघटन करण्यात आले.

---------------------------------------------------

एनएफएसयू - कॅम्पसच भूमिपुजन

कामठी तालुक्यात चिचोली इथ उभारण्यात येणा-या राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठाच्या कायमस्वरूपी कॅम्पसच आणि एनएफएसयूच्या **(NFSU)** तात्पुरत्या कॅम्पसच भूमिपुजन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आल. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उपस्थित होते. सुरवातीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते विटा रचून पायाभरणी करण्यात आली. तसच परिसरात ट्रांजिस्ट कॅम्पस च ई- अनावरण सुद्धा करण्यात आल. एनएफएसयू **(NFSU)** नागपूरचा ट्रांजिस्ट कॅम्पस पश्चिम नागपूरच्या सुभाष नगर भागात आहे, तर एनएफएसयू नागपूरचा नवीन आणि कायमस्वरूपी कॅम्पस चिचोली गावात ५० एकर जागेवर बांधला जाईल. राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ 2025-26 या शैक्षणिक वर्षापासून नागपूर कॅम्पसमध्ये न्यायवैद्यक विज्ञान आणि सायबर सुरक्षेशी संबंधित पाच अभ्यासक्रम सुरू होणार आहे.संस्थेत अत्याधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि वसतिगृह सुविधा असतील.कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना फॉरेन्सिक सायन्सच्या वैज्ञानिक वापराद्वारे गुन्हे रोखण्यास, कमी करण्यास आणि शोधण्यास मदत मिळेल आणि सर्व भागधारकांच्या फॉरेन्सिक क्षमता वाढवेल. तसंच या कॅम्पसमुळे कायदा आणि सुव्यवस्थेशी संबंधित विविध समस्या सोडवण्यास मदत होईल, ज्यामुळ न्यायदान प्रणाली वेगवान होईल. महाराष्ट्रात एनएफएसयूच्या नवीन कॅम्पसच्या स्थापनेसह ‘नागपूर कॅम्पस’ एनएफएसयूचा ११वा आणि महाराष्ट्र राज्यातील पहिला कॅम्पस असेल.नागपुर इथं आपल्या दोन दिवसीय दौऱ्यात विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्यानंतर केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांचे आज दुपारी नागपूर येथून विशेष विमानान नांदेडकडे प्रयाण झाले.

---------------------------------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी-विकासकामांचं उद्घाटन

देशाच्या विकासासाठी आवश्यक सर्व गोष्टी देशातच तयार व्हाव्यात ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेऊन आज ११ वर्षं पूर्ण झाली, त्यानिमित्त गुजरातमधे दाहोद इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रेल्वे इंजिन प्रकल्पासह, सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झालं. देशातलं औद्योगिक उत्पादन आणि निर्यातही सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक वस्तूंसह रेल्वे आणि मेट्रोचं तंत्रज्ञानही आपण इतर देशांना निर्यात करू लागलो असल्याचं ते म्हणाले. गेल्या काही वर्षात देशानं दशकांच्या बेड्या झुगारणारे अभूतपूर्व निर्णय घेतले आहेत असं त्यांनी सांगितलं.......

*(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 16 सेकंद)*

*इन वर्षों में देश ने वो फैसले लिये जो अकल्पनीय थे, अभूतपूर्व हैं। इन वर्षों में देश ने दशकों पुरानी बेड़ियों को तोड़ा है। देश हर सेक्टर में आगे बढ़ा है।*

आज १४० कोटी भारतीय विकसित भारताचा संकल्प साध्य करण्यासाठी झटत आहेत असं ते म्हणाले.यावेळी पंतप्रधानांनी या प्रकल्पातच तयार झालेल्या पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वे इंजिनाला तसंच वलसाड-दाहोद एक्सप्रेस रेल्वे गाडीलाही हिरवा झेंडा दाखवला.

-----------------------------------------------

नैऋत्य मोसमी पाऊस

राज्यात नैऋत्य मोसमी पावसानं १०७ वर्षांचा विक्रम मोडत वेळेआधीच प्रवेश केला आहे. मुंबईत मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागांत, तसंच रेल्वेरुळांवर पाणी भरलं आहे. विमानांची उड्डाणंही उशिरानं सुरू आहेत. शहरातल्या ९६ धोकादायक इमारतींमधल्या तीन हजारापेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. हवामान विभागानं आज मुंबईसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढच्या २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता असून, नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आली आहे. पुढचे काही दिवस मुंबई आणि राज्याच्या अनेक भागांत सतत जोरदार पावसाचा अंदाज असून नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचं पालन करावं आणि आवश्यक ती काळजी घ्यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे. कोकणात सर्वत्र तसंच सोलापूर, सांगली इत्यादी ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे. दरम्यान विदर्भात येत्या ३० मे पर्यंत

वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रान दिला आहे.

-----------------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किग्ज आणि मुंबई इंडियन्स या संघांचा सामना जयपूरला सवाई मानसिंग स्टेडीयमवर होणार आहे. खेळ संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

-----------------------------------------------

विचारमंथन कार्यशाळा

हवामानातील वाढत्या गरजा आणि वाढत्या ऊर्जेची मागणी लक्षात घेता, **CSIR-** राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था म्हणजेच निरी नागपूर मार्फत **(CSIR-NEERI, Nagpur)** २७ मे २०२५ रोजी हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे "ऊर्जा संवाद: स्वच्छ, व्यवहार्य,समावेशक" या विषयावर विचारमंथन कार्यशाळा आयोजित करणार असल्याची माहिती सीएसआयआर निरी, नागपूरचे **(CSIR NEERI)**संचालक डॉ.व्यंकट मोहन यांनी नीरी इथ आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

-----------------------------------------------